Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 827 – 833
DOI: 10.5281/zenodo.10281056

Original Research Article

# महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा परामर्श

प्रा. डॉ. अनिल दिगंबर वाडकर

विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा, तालुका औसा जिल्हा: लातूर ४१३५२० महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: adwadkar1983@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

## सारांश

"सत्य, अहिंसा, परमोधर्म या विचारावर आधारित संपूर्ण विश्वाला मानवतेचे दर्शन घडवनारे, मोहनदास करमचंद गांधी यांना महात्मा गांधी या नावाने ओळखले जाते. महात्मा गांधीजीचे सामाजिक व मानवते विषयक अनेक महत्त्वपूर्ण कार्य आहेत. गांधीजीच्या आर्थिक विचारांचा केंद्रबिंदू सर्वांना सक्तीचे व कौशल्य आधारित शिक्षण देणे,खेड्याकडे चला, सर्वोदय विचार, विश्वस्त संकल्पना, संपत्ती व उद्योगाचे विकेंद्रीकरण, श्रमप्रतिष्ठा, ग्रामस्वराज्य, स्वदेशी चळवळ, लघु व कुटीर उद्योग इत्यादी संबंधी होता. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारात स्वावलंबन या तत्त्वाला महत्त्वाचे स्थान होते. अलीकडच्या काळात देशासमोरील वर्तमान आर्थिक प्रश्न उदा. वाढती शहरे, प्रदूषण, बेरोजगारी, भूकबळी, बेकारी, दारिद्र्य, निरक्षरता, कर्जबाजारीपणा, शेतकरी आत्महत्या, आळशी प्रवृत्ती, महिला सबलीकरन, विदेशी व्यापार इत्यादी आर्थिक प्रश्नांचे निर्मूलन महात्मा गांधींच्या आर्थिक विचारातून होते. परिणामतः आजही शाश्वत विकासासाठी महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत."

## प्रस्तावना

सत्य आणि अहिंसा ही विचारधारा संपूर्ण भारतामध्ये नव्हेच तर, संपूर्ण विश्वामध्ये स्वतःच्या कृती मधून प्रसारित करणारे, एक महान व त्यागी व्यक्तिमत्व म्हणजे महात्मा गांधी होय. सत्य आणि अहिंसेच्या शक्तीवर, रक्त न सांडता गांधीजींनी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. कायद्यातील सर्वोच्च बॅरिस्टर ही सर्वोच्च पदवी त्यांनी प्राप्त केली. 1893 मध्ये एका खटल्याच्या संदर्भाने ते दक्षिण आफ्रिकेत गेले होते. तेथील शासन भारतीयावर करत असलेले अत्याचार त्यांनी पाहिले आणि तेथे त्या सरकारविरुद्ध आंदोलन उभा केले. 1914 - 15 पासून त्यांनी आपले सर्व लक्ष भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे कार्य करण्यासाठी केंद्रित केले. 1920 पासून त्यांनी भारतीय चळवळीची सूत्रे आपल्या हातात घेतली.

1920 मध्ये असहकार आंदोलन 1930 मध्ये दांडी यात्रा, 1940 मध्ये सविनय कायदेभंग, 1942 मध्ये चले जाव आंदोलन इत्यादी आंदोलने त्यांनी अहिंसेच्या मार्गाने उभी केली व देशाला 15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य मिळवून दिले. महात्मा गांधीजींचे हे राष्ट्रीय व सामाजिक कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण होते.

गांधीजींच्या आर्थिक विचारांचे मूळ तत्व हे स्वावलंबन होते. स्वातंत्र्यावेळी देशाची लोकसंख्या जवळपास 36 कोटी इतकी होती. त्यावेळी निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक होते. शिक्षणच नव्हें तर कौशल्य शिक्षण कुठून मिळणार? ब्रिटिशांनी देशातील सर्व संपत्ती पळवली होती. भारतीयाकडे जगण्यासाठी व विकासासाठी कोणत्याही प्रकारची साधने नव्हती. अशावेळी महात्मा गांधीजींनी श्रमप्रतिष्ठा या तंत्राला अनन्यसाधारण महत्त्व दिले. देशातील उपलब्ध नैसर्गिक संसाधने व श्रमशक्तीच्या आधारावर, देशातील उद्योग व शेतीचा विकास कसा करता येईल हे त्यांनी स्पष्ट केले. याचबरोबर आंतरराष्ट्रीय आर्थिक डावपेच लक्षात घेऊन देशाला स्वावलंबी बनवण्यासाठी स्व-स्वरक्षणार्थ धोरण कसे उपयुक्त आहे हे त्यांनी सांगितले. देशात समतोल प्रादेशिक विकास साध्य करावयाचा असेल तर देशातील उद्योगाचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे भारतातील बेरोजगारी कमी करावयाची असेल तर यंत्रा ऐवजी श्रमशक्तीचा वापर वाढवला पाहिजे , यातून बेरोजगारी कमी होईल लोकांची क्रयशक्ती वाढेल आणि यातून देशांतर्गत वस्तूचे उत्पादन व मागणी यात समतोल घडून आर्थिक गतिमानता साध्य होईल असे त्यांनी सांगितले.आपण मूलभूत गरजांच्या बाबतीत इतर राष्ट्रावर अवलंबून राहिलो तर आपणास आपल्या देशाच्या हिताचे कनखर आर्थिक निर्णय घेता येणार नाहीत.उलट पारतंत्र्याकडे झुकावे लागेल. म्हणून गांधीजींनी स्वदेशीचा स्वीकार व स्वयंपूर्ण खेडी या तत्त्वाला जास्तीची बळकटी दिली.देशातील उद्योजक हा त्यांच्या बुद्धीचातुर्याने जरी संपत्ती निर्माण करत असला तरी, त्याला या संपत्तीची मनमानी उधळणी करता येणार नाही त्याचे राहणीमान हे सामान्य भारतीय सारखे असले पाहिजे. या अनुषंगाने त्यांनी विश्वस्त ही संकल्पना मांडली. देशातील विविध राजकीय व सामाजिक संस्थांचे सदस्य तसेच विश्वस्त हे प्रामाणिक चौकटीच्या कसोटीवर उतरले पाहिजेत यासाठी ते म्हणतात की," खऱ्या विश्वस्ताला वारस नसतो' अशा प्रकारचे विविध विचार नैतिकतेच्या तत्त्वावर,सत्य आणि अहिंसेच्या शक्तीवर देशामध्ये तत्कालीन परिस्थितीमध्ये रुजवण्याचे कार्य महात्मा गांधीजींनी केले.त्यांच्या याच प्रमुख आर्थिक व विकास विषयक विचारांचे समालोचन या प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मी केले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

प्रस्तुत शोधनिबंधाला योग्य दिशा प्राप्त करण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे.

१. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा शोध घेणे.
२. वर्तमानामध्ये गांधीजींचे आर्थिक विचार देशाच्या विकासासाठी कसे उपयुक्त ठरतात याचा आढावा घेणे.
३. महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने द्वितीय सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध शासकीय व निमशासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे इत्यादीचा अवलंब करण्यात आला आहे.

### १. ग्रामस्वराज्य

प्राचीन भारतामध्ये उत्पादन, वितरण आणि उपभोग या तीनही प्रक्रिया एकाच पातळीवर होत असत. या कल्पनेचे पुनरूजीवन व्हावे असे, महात्मा गांधीजींना वाटत होते. कारण प्राचीन भारतातील खेडी ही स्वयंपूर्ण होती. खेड्यातील शेती ही समृद्ध होती. खेड्यातील उद्योगाद्वारे लोकांच्या गरजा पूर्ण होत असत. ग्रामीण भागात सुप्त बेकारी, ग्रामीण भागातील लोकांचे शहराकडे स्थलांतरण असे प्रकार त्यावेळी नव्हते.याचा अर्थ लोक परिपूर्ण जीवन जगत होते.महात्मा गांधी म्हणत असत, खरा भारत हा खेड्यामध्ये नांदतो आहे.म्हणून 'खेड्याकडे चला' असा नारा महात्मा गांधीजींनी दिला. देशाचा विकास होण्यासाठी प्रत्येक खेडे हे आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांची ग्रामस्वराज्याची संकल्पना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण खेड्यावर आधारित होती. खेड्यातील लोकांचे राहणीमान अत्यंत साधे व भारतीय संस्कृतीचे जतन करणारे माणसे खेड्यातून असावीत, एवढेच नव्हे तर, प्रत्येक खेडे हे परिपूर्ण गणराज्य असावे तसेच आपल्या आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी त्यांना शेजाऱ्यावर अवलंबून राहण्याची आवश्यकता भासू नये, असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी आदर्श खेळाची वैशिष्ट्ये मांडली ती म्हणजे 1) खेड्याची रचना व्यवस्थाबद्द असावी. अन्न, वस्त्र व निवारा यासोबतच खेडे हे आर्थिक स्वयंपूर्ण असावीत. 2) प्रत्येक खेड्यामध्ये स्वच्छ रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था, फुलझाडे, धर्मशाळा व नाट्यगृहे दवाखाना, समाज मंदिर, स्वच्छ पाण्याची व्यवस्था असावी. 3) खेड्यातील कृषी व्यवसाय हा प्रगत असावा.प्रत्येक खेड्यात मुलांना खेळण्यासाठी मैदाने, गुरासाठी गोठे, मूलभूत शिक्षण सक्तीचे असावे. 4) प्रत्येक खेड्यातील जातिव्यवस्था नष्ट झाली पाहिजे. तसेच ग्रामपंचायतीला कायदे करण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे न्यायालय अधिकार असावेत.

### २. विश्वस्ता संबंधी विचार

महात्मा गांधीजींच्या अपरिग्रह या कल्पनेतून विश्वस्त या संकल्पनेचा उदय झाला. समाजातील लोकांनी संपत्ती व मालमत्ता संग्रह न करण्याचे ठरवले तर समाजातील आर्थिक विषमता कमी होईल. खाजगी मालमत्तेच्या विरोधात गांधीजी मुळातच नव्हते. परंतु खाजगी मालमत्तेचा दुरुपयोग होऊ नये असे त्यांना वाटत होते.खऱ्या विश्वस्ताला वारस नसतो असे त्यांचे मत होते. एखाद्या व्यापाऱ्याला व्यवसायात नफा झाला असेल तर, ती सर्व संपत्ती त्याच्या मालकीची नसून, समाजाच्या मालकीची असते. स्वतःला सन्मानाने जगण्याचा अधिकार त्या व्यक्तीला जरूर आहे .परंतु त्याचे जगणे हे भारतातील कोट्यावधी सामान्य लोक जगतात असे असावे. महात्मा गांधी यांच्या मते, श्रीमंत व्यक्तीचे हृदय परिवर्तन करावे व त्याने त्याची संपत्ती ही गरिबांच्या कल्याणासाठी वापरावी असे त्यांना वाटत होते.मानवी स्वभाव सुधारणे अशक्य नाही.भांडवलदाराच्या स्वभावात बदल झाला तर भांडवलशाहीचे रूपांतर, क्षमतेवर आधारित समाजात होऊ शकते.व्यक्तीने गरजे इतकीच खाजगी मालमत्ता जवळ बाळगावी.इतर संपत्ती मात्र समाज कल्याणसाठी वापरावी. संपत्तीची मालकी, उपभोग याला नियंत्रित करण्यासाठी वेळप्रसंगी कायद्याचा आधार घेतला जावा.व्यक्तीने स्वतःच्या संपत्तीचा उपभोग, स्वतःच्या चैनी व स्वार्थी जीवन जगण्यासाठी किंवा समाजविरोधी कृती करण्यासाठी करू नये.श्रमिकासाठी किमान वेतन निश्चित करावे.तसेच व्यक्तीने जास्तीत जास्त किती उत्पन्न मिळवावे यालाही एक मर्यादा असावी.किमान आणि कमाल उत्पन्न यामध्ये देखील अत्यंत कमी फरक असावा अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेत समाजाच्या गरजा लक्षात घेऊन उत्पादन करावे.असे गांधीजींचे मत होते.

**३. यांत्रिकीकरण**

अवजड व मूलभूत यंत्राचा वापर करणे हे टाळता न येण्यासारखे असते. यांत्रिकीकरण अपरिहार्य संकट असल्यामुळे अशा क्षेत्रात त्याचा अवलंब करावाच लागेल. परंतु तेथे शोषण होऊ नये यासाठी उद्योगावर शासनाची मालकी हवी.मूलभूत उद्योग कोणते असावेत यासंबंधी योग्य निर्णय घ्यावेत.इतर क्षेत्रात लघु उद्योगांना प्रोत्साहन द्यावे.जी संसाधने मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत त्याला ते सागरी अर्थनीती म्हणतात. व जी संसाधने मर्यादित आहेत त्याचा वापर जास्त करण्याच्या धोरणाला ते तलाव अर्थनीती म्हणतात.जर कमी साधनावर आधारित अर्थनीती वापरली तर, देशामध्ये स्पर्धा वाढेल.हिंसा निर्माण होईल.कोळसा, पेट्रोल यासारखे इंधन वापरणे ऐवजी पशु शक्तीचा व श्रमशक्तीचा वापर केला जावा असे त्यांचे मत होते.

**४. सर्वोदय**

सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय किंवा सर्वांचे कल्याण होय गांधीजींच्या मते, सर्वोदयामध्ये जीवनाच्या सामाजिक आर्थिक व राजकीय बाबींचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. सर्वोदय ही संकल्पना भारतीय संस्कृती आणि भारतीय जीवनाचे आदर्श या विचारावर उभी आहे.सर्वांचे कल्याण साधने हे या संकल्पनेचे उद्दिष्ट असल्याने, या चळवळीद्वारे प्रत्येकाला रोजगार, अंगभर वस्त्र आणि निवारा मिळण्याची खात्री असेल.यामध्ये कसल्याही प्रकारचा उच्च-नीच, तसेच व्यवसायानुसार भेद नसेल. सगळ्यांना उत्पन्न मिळविण्याचा व जगण्याचा हक्क असेल.सर्वोदय समाज हा वास्तविक स्वतंत्र समाज असेल. पण जगातील सर्व जाती-धर्माचा आदर करणारा  समाज असेल.समाजातील लोक, रोग, दारिद्र्य, आणि भीती यापासून मुक्त असतील. शिक्षणाची सर्वांना समान संधी असेल. या समाजात अस्पृश्यता नसेल.कामगार आणि मालक जमीनदार आणि कुळे यांच्यात संघर्ष नसेल.मोठे उद्योग अत्यंत अल्प असतील.त्या उद्योगात यंत्रे वापरली जातील, परंतु ते मर्यादित राहतील. यामुळे बेकारी वाढणार नाही याकडे लक्ष दिले जाईल.सर्वोदयाशिवाय सर्वोदय समाज अस्तित्वात येऊ शकणार नाही. यासाठी सर्वोदय कार्यकर्त्यांनी कार्यक्षमपणे कार्यरत राहिले पाहिजे. या समाजात कोणत्याही गटाकडून कोणाचेही शोषण केले जाणार नाही. प्रौढ व्यक्तींनाही सर्वसामान्य शिक्षण आणि तांत्रिक शिक्षण दिले जाईल.ग्रामीण भागात सर्व कुटुंबामध्ये सुत-कताई केली जाईल. त्यामुळे कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

**५. श्रमप्रतिष्ठा**

महात्मा गांधीजींच्या मते, कोणत्याही प्रकारचे काम कमी प्रतीचे नसते. श्रम किंवा कामाची पूजा केली पाहिजे. कारण त्यामुळे आपले आरोग्य चांगले राहते. जी व्यक्ती या निसर्ग नियमाचे उल्लंघन करेल ती स्वतः अडचणीत येईल.श्रम करणे हे पवित्र कार्य आहे त्यामुळे माणसाचे आरोग्य व मानसिक स्थिती सुव्यवस्थित राहते. श्रमामुळेच मनुष्याला समाजात प्रतिष्ठा मिळते.

**६. अर्थशास्त्र व नीतीशास्त्र**

अर्थशास्त्रामधुन नीतिशास्त्र हे वेगळे होऊ शकत नाही.एखादा देश दुसऱ्या देशाचे शोषण करण्यास सांगत असेल, साम्राज्यवाद प्रस्थापित करण्यासाठी सूचना देत असेल, तर त्याची आर्थिक नीती ही अनैतिक आहे.शोषण केलेल्या श्रमाद्वारे, उत्पादित केलेल्या वस्तूची खरेदी करणे किंवा तिचा वापर करणे हे अनैतिक आहे. एखाद्या उद्योगाला फार मोठा नफा प्राप्त होत असेल किंवा भागधारकाला मोठ्या प्रमाणात लाभांश दिला जात असेल तर तो उद्योग मोठा समजण्याचे कारण नाही.ज्या उद्योगातून मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतो व समाजाच्या गरजा पूर्ण केल्या जातात असा

उद्योग महत्त्वाचा असेल. आर्थिक नियम हे सामाजिक आणि नैतिक विचारावर आधारित असावेत. तसेच त्यामध्ये अहिंसा आणि प्रेम या तत्त्वांचा समावेश असला पाहिजे. असे गांधीजींचे मत होते.

**७. स्वदेशीचा स्वीकार**

प्रत्येक भारतीयांनी स्वदेशीचा आग्रह धरला तरच, देशातील उद्योगांना प्रोत्साहन मिळेल. विदेशातून येणाऱ्या वस्तूंचे आक्रमण थांबवता येईल. परदेशातील वस्तूंची मागणी कमी झाल्यामुळे परदेशात जाणारी आपली संपत्ती थांबेल.त्यामुळे देशात राहिलेल्या या संपत्तीचा उपयोग देश विकासासाठी करता येईल. देशातील वस्तूंचा दर्जा, याचा विचार न करता, प्रत्येक भारतीयांनी देशातील विविध क्षेत्रात तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर करावा तरच देश आर्थिक दृष्ट्या संपन्न होईल.भारतीयांच्या दारिद्र्याला स्वदेशीचा त्याग हे प्रमुख कारण आहे असे गांधीजींना वाटत होते. विदेशी वस्तूंच्या वापरामुळे स्वदेशी वस्तूला मागणी नाही. त्यामुळे उत्पादन कमी, रोजगार कमी, तसेच उत्पन्न कमी त्यामुळे दरिद्री अवस्थेत जीवन जगावे लागते.असे विचार स्वदेशीच्या बाबतीत गांधीजींनी व्यक्त केले.

**८. विकेंद्रीकरण**

देशाच्या समतोल आर्थिक विकासासाठी उद्योगाचे विकेंद्रीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. गांधींजीच्या मते, उद्योगाचे केंद्रीकरण झाले तर, शहरे मोठ्या प्रमाणात वाढतील, शहराची लोकसंख्या वाढेल.त्यातून अनेक आर्थिक, सामाजिक प्रश्न निर्माण होतील.आरोग्य, पाणीपुरवठा, शिक्षण, कचरा व सांडपाणी व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रन यासंबंधी आर्थिक विकल्पावर अवाजवी ताण पडेल.परिणामी प्रदूषण, हिंसा, अनाचार वाढेल.मोठ्या उद्योगामधे भांडवल उभारणीसाठी, भांडवलदाराची मक्तेदारी निर्माण होईल व लोकांचे शोषण वाढेल. त्यापेक्षा ग्रामीण भागात सर्वत्र छोटे छोटे उद्योग स्थापन करावेत.जेणेकरून सर्वांच्या हाताला, सर्व विभागांमध्ये, क्षमतेनुसार काम उपलब्ध होईल,लोकांचे स्थलांतरण थांबेल, उत्पादित मालाच्या वितरणाच्या प्रश्न राहणार नाही.केंद्रीकरणाचे दोष टाळता येतील. असे महत्त्वपूर्ण विचार गांधीजींनी मांडले.

**निष्कर्ष**

1.वर्तमानामध्ये बकाल वाढत जाणारी शहरे व उद्योगाचे केंद्रीकरण यामुळे ग्रामीण लोकसंख्येचे शहराकडे स्थलांतरण होत आहे. परिणामी अनेक गंभीर समस्या शहरांमध्ये निर्माण होत आहेत. उदाहरणार्थ कचरा, प्रदूषण, रोगराई,वाहतूक नियंत्रण, सांडपाण्याची व्यवस्था, आरोग्य, शिक्षण, सामाजिक अशांतता, दंगे, इत्यादी अराजकता निर्माण होत आहे. यावेळी महात्मा गांधीजींची ग्रामस्वराज्य ही संकल्पना व त्यातील आदर्श या समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी मार्गदर्शक कार्य करतात. 2.अलीकडच्या काळामध्ये भ्रष्ट राजकारण्यांची स्वार्थी प्रवृत्ती तसेच भांडवलदारांचा नफेखोरीपणा यामुळे आर्थिक व सामाजिक विषमता प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. श्रीमंत श्रीमंत होत आहेत व गरीब गरीब होत आहेत.10 टक्के भारतीयांकडे 90 टक्के संपत्ती केंद्रित झाली असून, 90 टक्के सामान्य भारतीयांकडे 10 टक्के सुद्धा संपत्ती शिल्लक राहिलेली नाही.ही विषमता आपल्या लक्षात येते.यावेळी महात्मा गांधीजींच्या मते खऱ्या विश्वस्ताला वारस नसतो हा विचार मार्गदर्शक ठरतो. 3.उद्योगाशिवाय देशाचा विकास शक्य नाही. परंतु उद्योग हे केंद्रित न होता, विकेंद्रीत स्वरूपात सर्व प्रदेशात व राज्यांमध्ये चालू झाले पाहिजेत.अलीकडच्या काळात यंत्राशिवाय चांगल्या दर्जाचे उत्पादन व गुणवत्ता टिकवणे शक्य होत नाही.भारत हा 142 कोटी लोकांचा देश आहे.यामध्ये सर्वांना

त्या त्या प्रदेशात रोजगार उपलब्ध करून द्यायचा असेल , समतोल प्रादेशिक विकास साध्य करावयाचा असेल , नैसर्गिक संसाधनाचा पर्याप्त वापर करावयाचा असेल तर, यंत्र हे कमी प्रमाणात वापरले पाहिजेत व त्या त्या प्रदेशात श्रमिकावर आधारित लघु उद्योगातून अधिक उत्पादन घेण्यावर भर देण्यात यावा. 4.भारतामध्ये अनेक प्रकारच्या विषमता आहेत.त्यामुळे देशाचा विकास जलद गतीने होत नाही.सामजिक व आर्थिक विषमता नष्ट करावयाची असेल तर भारतीयांनी सर्वोदय समाजाचे आदर्श गुण स्वीकारले पाहिजेत. 5.कोणतेही श्रम कमी प्रतीचे नसते.श्रमामुळे माणसाची प्रतिष्ठा वाढते.आरोग्य चांगले राहते. स्वच्छता करणारा भंगी असेल किंवा एखादा इंजिनियर असेल दोघांचेही कार्य सारखेच असते.देश विकासामध्ये त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असते.यामुळे ते करत असलेल्या कार्यावरून एखाद्याला कमी समजणे किंवा एखाद्याला जास्तीचे महत्व देणे हे योग्य नाही. म्हणून प्रत्येक श्रम हे पूजनीय आहे. 6.देशाच्या विकासाची आर्थिक धोरणे तयार करत असताना त्यामध्ये जर नीतिमत्ता नसेल नैतिक विचार नसतील तर देशामध्ये संपत्तीक विषमता मोठ्या प्रमाणात वाढेल.भांडवलदार श्रमिकांचे शोषण मोठ्या प्रमाणात करतील त्यामुळे अशा शोषित श्रमापासून तयार केलेल्या वस्तूचे उत्पादन कोणी विकत घेऊ नये ही नैतिकता आहे.देशातील उद्योग हे जास्तीचा नफा कमवण्यापेक्षा जास्तीचा रोजगार व विकासाच्या संधी निर्माण करणारे असावेत. 7.भारतासारख्या विकसनशील देशाने स्वतःच्या राष्ट्रातील उत्पादित वस्तूंचा उपभोग न घेता इतर राष्ट्रातील उत्पादित वस्तू मोठ्या प्रमाणात आयात केले व उपभोग घेतला तर, आपल्या देशाचे आर्थिक दिवाळे निघेल.व्यापारात वित्तीय तूट निर्माण होईल व देशातील मोठी संपत्ती विदेशातील उत्पन्न बनेल.आपला देश विकासापासून दूर राहील असे होऊ नये यासाठी, आपल्या देशातील वस्तूच्या उत्पादनाचा दर्जा इतर देशातील उत्पादनापेक्षा कमी असला तरी, देशाच्या विकासासाठी संपूर्ण भारतीयांनी, स्वदेशीचा स्वीकार केला पाहिजे. वर्तमान परिस्थितीमध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे, संपूर्ण जग हे एक विशाल खेडे बनलेले आहे.वाहतूक व दळणवळण सुविधांचा प्रचंड विकास झाला आहे. एकीकडे भारतामध्ये प्रचंड लोकसंख्या वाढत आहे तर दुसरीकडे बेरोजगारी, दारिद्र्य, रोगराई, प्रदूषण, वाहतूक नियंत्रण, आर्थिक व सामाजिक विषमता, उद्योगाचे केंद्रीकरण, श्रमिकांचे शोषण असे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.देशातील सामान्य गरिबांना इतर देशातून दर्जेदार व चांगल्या प्रतीच्या वस्तू उपभोगण्यासाठी मिळत असतील, रोजगाराच्या नवीन संधी मिळत असतील तर लोकांनी त्या का घेऊ नयेत असा प्रश्न निर्माण होतो.सामान्य भारतीयांना असे वाटते की एकीकडे भ्रष्ट राजकारणी अनेक उद्योगपती देशाला लुटत आहेत.सर्वसामान्यांचे शोषण करत आहेत तर सामान्य नागरिकांनीच देशप्रेम व राष्ट्रनिष्ठा का जोपासावी, तरुण मुलांना त्यांच्या हाताला रोजगार नाही, कौशल्य शिक्षण नाही, परिणामी उत्पन्न नाही व राहणीमानाचा दर्जा अत्यंत निकृष्ट झाला आहे.त्याला त्याच्या अत्यावश्यक गरजा भागविणे शक्य नाही.त्यामुळे आजच्या परिस्थितीमध्ये सर्वसामान्यांच्या विकासाबरोबर देशाचा जलद गतिमान आर्थिक विकास साध्य करण्यासाठी.देशातील आराजक्ता थांबिण्यासाठी सत्य, अहिंसा, परमोधर्म, स्वावलंबन, स्वदेशीचा स्वीकार, उद्योगाचे विकेंद्रीकरण, खेड्यांचा विकास, ग्रामस्वराज्य, विश्वस्त, सर्वोदय इत्यादी महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा अवलंब केला तर निश्चितच भारताचा समतोल विकास साध्य करण्यास यशस्वीता लाभेल.

**संदर्भ सूची**

१. History of economic thoughts - T. N. Hajela
२. Gandhian economics - Rushim Sharma
३. 'सत्याचे प्रयोग' आत्मकथा, मोहनदास करमचंद गांधी, 2003

४. 'गांधी और मानवता का भविष्य' रामजी सिंग, प्रथम संस्करण, 2000

५. 'अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास' प्रा. पी. आर. कुमानाचे

६. आर्थिक विचारांचा इतिहास प्रा. अ. रा. रायखेलकर

७. योजना, कुरुक्षेत्र, लोकराज्य मासिकाचे विविध अंक